रविवार
गांवकरी

४ सप्टेंबर २०११

# रवींद्रनाथ टागोरांचे आयुष्य म्हणजे कला व सूर यांचा महोत्सव: डॉ. नरेंद्र जाधव

नाशिक (वार्ताहर) : रवींद्रनाथ टागोरांचे आयुष्य म्हणजे कला व सुर यांचा महोत्सव आहे, असे प्रतिपादन केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.नरेंद्र जाधव यांनी केले.

कुसुमाग्रज प्रतिष्ठान आयोजित 'रवींद्रनाथ टागोर व्यक्ती व कार्य' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. टागोरांचा संपूर्ण जीवनप्रवास डॉ.जाधव यांनी श्रोत्यांसमोर यावेळी उलगडून दाखवला.

टागोरांचे व्यक्तिमत्त्व हे बहुआयामी शब्दाच्या पलीकडले होते. साहित्याचे पहिले नोबेल मिळविणारे रवींद्रनाथ विश्वकवी, कथाकार, नर्तक, नाटककार, अभिनय, कादंबरीकार, चित्रकार, दिग्दर्शक, गायक, शिक्षणतज्ञ, संगीत अशा सर्वच क्षेत्रात निपूण होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपल्या आयुष्यात ५५ कवितासंग्रह, ३ कथासंग्रह, १४ कादंबऱ्या, ३८ नाटके, दोन हजारपेक्षाही जास्त गाण्यांना संगीत, विदेशात चित्रांचे प्रदर्शन, दोन देशांचे राष्ट्रगीतही त्यांनी लिहिले.



रवींद्रनाथ टागोर जातीने पिराली ब्राह्मण होते. त्यांच्या जीवनावर त्यांचे वडील, तसेच भावांचा प्रभाव होता. मैत्री आणि प्रेम यांच्यामधील भाग म्हणजे अनुरागिणी, टागोरांच्या आयुष्यात त्यांच्या वहिनी कादंबरी देवी, महाराष्ट्रातील आत्माराम तर्खडकरांची मुलगी अन्नपूर्णा, जर्मन अनुवादक हेलन फ्रँक व अर्जेंटिनातील धनाढ्य कवियित्री वीत्तोरिया वोकाम्पू या अनुरागिणी म्हणून आल्या. या अनुरागिणींनी त्यांचे आयुष्य समृद्ध केल्याचे जाधव यांनी सांगितले.

महात्मा गांधी आंदोलनाची सुरुवात करताना रवींद्रनाथांचे आशीर्वाद घेत असत, तसेच सत्याग्रहाची कल्पना सर्वात अगोदर रवींद्रनाथांनी आपल्या एका नाटकात मांडल्याचे जाधव यांनी सांगितले.

टागोरांचे शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन बरोबरही वाद झाले. गांधींना महात्मा ही उपाधी टागोर यांनी तर टागोरांना गुरुदेव ही उपाधी गांधींनी दिल्याचे जाधव म्हणाले.

लोकमान्य टिळकांना राजद्रोहाचा खटला चालविण्यासाठी टागोरांनी मदत पाठविली होती. तसेच पुणे कराराच्या वेळी महात्मा गांधींचे उपोषण सोडविण्यासाठीही टागोर पुण्याला आले होते, गांधींना सरबत देणारी मुलगी इंदिरा गांधी असल्याचे जाधव म्हणाले. व्याख्यानाचा समारोप 'हे अभागी देशा', 'भयशून्य चित्त जेथ', 'शिवाजी उत्सव' या रवींद्रनाथ टागोर लिखीत कविता वाचनाने झाला.

प्रारंभी कुसुमाग्रज शताब्दी महोत्सवाचे अध्यक्ष विलास लोणारी यांनी डॉ.जाधव यांचे स्वागत केले. परियच चंद्रशेखर कुलकर्णी यांनी तर आभार प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रंजना पाटील यांनी मानले. व्याख्यानाला प्रतिष्ठानचे विश्वस्त तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.